# कार्यकारी सारांश

## डोलोमाइट व मॅंगनीज ओरच्या सद्याच्या ग्राइंडिंग व स्क्रीनिंग युनिट मध्ये रोस्टिंग फर्नेसद्वारे 30,000 TPA मॅंगनीज ऑक्साइड आणि 12,000 TPA मॅंगनीज सल्फेट उत्पादन प्रकल्पाचा विस्तारिकरण प्रस्ताव

*ब्राऊनफिल्ड प्रकल्प*

खसरा नं. 99. गाव– आष्टी (खुर्द), तहसिल–सावनेर,

जिल्हा नागपूर, महाराष्ट्र

*[Project comes under Category "A" of Schedule, 3 (a) Metallurgical Industries (Ferrous and Non-ferrous) as per EIA Notification dated 14th September, 2006 & its amendments thereof]*

| *प्रकल्प प्रवर्तक* | *पर्यावरणीय सल्लागार :* |
| --- | --- |
| *जिगसन अलॉयज प्रायव्हेट लिमिटेड*<br>*खसरा नं. 99. गव– आष्टी (खुर्द), तहसिल–सावनेर, जिल्हा नागपूर, महाराष्ट्र* | PECS<br>*पोल्यूशन एण्ड इकॉलॉजी कन्ट्रोल सर्विसेस* **(PECS)**<br>*धंतोली पोलिस स्टेशन जवळ, धंतोली नागपूर,*<br>***Email: pecsnagpur@gmail.com***<br>***Accreditation no.: NABET/EIA/25-28/RA 0474***<br>***Valid upto: October 16, 2028*** |

# कार्यकारी सारांश

## 1.0 प्रस्तावना

प्रकल्प प्रवर्तक ह्यांच्या महाराष्ट्र राज्यातील नागपूर जिल्ह्यातील सावनेर तालुक्यातील आष्टी (खुर्द) गावातील खसरा क्र. 99 येथे डोलोमाइट आणि मॅंगनीज ओरचे ग्राइंडिग आणि स्क्रिनिंग करणारा प्रकल्प सद्या कार्यरत आहे.. स्टिल, रसायने, खते, बॅटरी आणि संबंधित उद्योगांसारख्या विविध औद्योगिक क्षेत्रांमध्ये मूल्यवर्धित मॅंगनीज उत्पादनांची वाढती मागणी लक्षात घेऊन, प्रकल्प प्रवर्तकांनी या विद्यमान प्रकल्पाचा विस्तार करण्याचा प्रस्ताव केला आहे.

प्रस्तावित विस्तारामध्ये रोस्टिंग फर्नेसद्वारे 30,000 TPA मॅंगनीज ऑक्साईड आणि 12,000 TPA मॅंगनीज सल्फेट उत्पादनची भर घालणे, तसेच त्याच्याशी संबंधित पायाभूत सुविधा व प्रदूषण नियंत्रण यंत्रणा उभारणे यांचा समावेश आहे. मॅंगनीज ओरचे मूल्यवर्धित उत्पादनांमध्ये रूपांतर करून त्याचा वापर वाढवणे आणि त्याद्वारे औद्योगिक व आर्थिक विकासाला हातभार लावणे, हे या प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे. हा प्रस्तावित प्रकल्प सद्याच्याच औद्योगिक परिसरामध्येच उभारण्यात येणार असून, यामुळे या भागात प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी निर्माण होणे अपेक्षित आहे लागू असलेल्या पर्यावरणविषयक नियमांचे पालन सुनिश्चितपणे करण्यासाठी आणि प्रकल्पाचे कामकाज शाश्वत पद्धतीने चालविण्यासाठी, प्रकल्पाच्या आराखड्यात पर्यावरण संरक्षणाचे पुरेसे उपाय व प्रदूषण नियंत्रण यंत्रणांचा समावेश करण्यात आला आहे.




**स्त्रोत : SOI टोपोशिट**

स्थलाकृति नकाशा (10 कि.मी. त्रिज्येत)




**प्लांट लेआऊट**

## 2.0 प्रकल्पाचे वर्णन

### प्रकल्पाची रूपरेषा

| अनु क्र. | विवरण | माहिती |
|---|---|---|
| 1 | प्रकल्पाचे स्वरूप | डोलोमाइट व मॅगनीज ओरच्या सद्याच्या ग्राइंडिंग व स्क्रीनिंग युनिट मध्ये रोस्टिंग फर्नेसद्वारे 30,000 TPA मॅगनीज ऑक्साइड आणि 12,000 TPA मॅगनीज सल्फेट उत्पादन प्रकल्पाचा विस्तारिकरण प्रस्ताव |

<table>
<tr><td>2</td><td>प्रकल्प स्थळ</td><td>खसरा नं. 99, गाव– आष्टी (खुर्द), तहसिल–सावनेर, जिल्हा नागपूर, महाराष्ट्र</td></tr>
<tr><td>3</td><td>कॉन्फिगरेशन</td><td>30000 TPA मॅंगनीज ऑक्साइड आणि<br>12000 TPA मॅंगनीज सल्फेट</td></tr>
<tr><td>4</td><td>कच्चामाल</td><td>
<table>
<tr><th>अनु. क्र.</th><th>कच्चा माल</th><th>प्रस्तावित आवश्यकता (TPA)</th><th>स्त्रोत</th><th>परिवहनाचे मार्ग</th></tr>
<tr><td colspan="5">मॅंगनीज ऑक्साइड</td></tr>
<tr><td rowspan="2">1.</td><td>मॅंगनीज ओर</td><td>39,000 TPA</td><td>MOIL आणि आयात</td><td>ताडपत्री ने आच्छादित डंपर ने रस्त्याद्वारे</td></tr>
<tr><td>हार्ड कोक</td><td>7,500 TPA</td><td>स्थानिक विक्रेते</td><td>ताडपत्री ने आच्छादित डंपर ने रस्त्याद्वारे</td></tr>
<tr><td colspan="5">मॅंगनीज सल्फेट</td></tr>
<tr><td rowspan="3">2.</td><td>मॅंगनीज ओर</td><td>12000 TPA</td><td>MOIL आणि आयात</td><td>ताडपत्री ने आच्छादित डंपर ने रस्त्याद्वारे</td></tr>
<tr><td>सल्फ्यूरिक एसिड</td><td>7660 TPA</td><td>गुजरात</td><td>टॅंकरने रस्त्याद्वारे</td></tr>
<tr><td>फायरवुड</td><td>3000 TPA</td><td>स्थानिक विक्रेते</td><td>रस्त्याद्वारे</td></tr>
</table>
</td></tr>
<tr><td>5</td><td>प्रस्तावित प्रकल्पासाठी पाण्याची गरज</td><td>सद्याचे: 2 KLD<br>प्रस्तावित: 52 KLD<br>एकुण: 54 KLD<br>स्त्रोत: भुजल</td></tr>
<tr><td>6</td><td>विजेची आवश्यकता आणि स्त्रोत</td><td>500 KW<br>स्त्रोत: MSEDCL</td></tr>
<tr><td>7</td><td>प्रस्तावित प्रकल्पासाठी जमीन</td><td>3.90 हे.</td></tr>
<tr><td>8</td><td>युनिट कार्यान्वित झाल्यानंतर एकूण मनुष्यबळ</td><td>100</td></tr>
<tr><td>9</td><td>प्रकल्पाचा अंदाजित खर्च</td><td>सद्याचे किमत: रू. 3.7 कोटी<br>प्रस्तावित किमत: रू. 4.0 कोटी<br>एकुण किमत: रू. 7.7 कोटी</td></tr>
</table>

## 3.0 प्रक्रिया वर्णन




**आकृती: MnO उत्पादनाची प्रक्रिया**




**आकृती : मॅगनीज सल्फेटची उत्पादन प्रक्रिया**

## 4.0 पर्यावरणाचे वर्णन

### वायु पर्यावरण

परिवेशी वायु गुणवत्ता वायुच्या दिशेवर आधारित निवड करण्यात आलेल्या 8 ठिकाणांवर मोजण्यात आली, जी खालील श्रेणीत आढळली.

$PM_{10}$ : 39.0 - 69.7 µg/$m^3$.

$PM_{2.5}$ : 15.8 – 40.1 µg/$m^3$

$SO_2$ : 10.3 – 29.5 µg/$m^3$

$NO_x$ : 12.3 – 34.1 µg/$m^3$

| आद्योगिक क्षेत्र निवासी, ग्रामिण क्षेत्र (CPCB मानक) | $PM_{10}$ | $PM_{2.5}$ | $SO_2$ | NOx |
|---|---|---|---|---|
| | 100 µg/$m^3$ | 60 µg/$m^3$ | 80 µg/$m^3$ | 80 µg/$m^3$ |

PM $PM_{10}$, $PM_{2.5}$, $SO_2$, o NOx ची तिव्रता राष्ट्रीय परिवेशी गुणवत्ते च्या प्रमाणत (NAAQ) आढळली.

### जल पर्यावरण

सात भुपृष्ठजल आणि आठ भूजलाचे असे एकूण 15 नमुने संकलित करून त्यांचे विश्लेषण करण्यात आले. अमेरिकन पब्लिक हेल्थ असोसिएशन (APHA) पब्लिकेशनच्या स्टँडर्ड मेथड्स फॉर ॲनालिसिस ऑफ वॉटर अँड वेस्टवॉटरनुसार पाण्याच्या नमुन्यांचे विश्लेषण करण्यात आले. त्यानुसार असे निदर्शनास आले की भुजल तसेच भूपृष्ठजलाची गुणवत्ता पिण्याचे पाणी हे कोलीफॉर्म सोडून हे (BIS 10500-2012) ने निर्धारित केलेल्या अनुसंबंधित प्रमाणांच्या आत होतो. भुपृष्ठ जलात कोलीफॉर्म आढळले जे मानवी वापरामुळे आहे.

### ध्वनी पर्यावरण

प्रस्तावित विस्तारित प्रकल्पामध्ये सर्व आठ निरिक्षण स्थळांवर 38.1 dB(A) (रात्रीच्या वेळी) आणि 54.3 dB(A) दिवसाला या श्रेणीत ध्वनीची पातळी नोंदविण्यात आली जे कारण अधिकांश कामे ही दिवसाच्या वेळी केली जातात. त्यामुळे दिवसा ध्वनीची मात्रा जास्त आढळुन आली.

सर्व आठ स्थळांवर मोजण्यात आलेली ध्वनि पातळी मर्यादेत आहे. ध्वनि पातळी मानकाकरिता MoEF&CC राजपत्र अधिसूचनेत दिल्याप्रमाणे रहिवासी 65.0 dB(A) किंवा औद्योगिक क्षेत्राकरिता 75.0 dB(A) च्या मर्यादेत आहे.

## मृदा पर्यावरण

प्रस्तावित प्रकल्प क्षेत्राच्या सभेवतालील परिसरातील सद्याच्या मृदा अवस्थेतील मातीचे भौतिक–रासायनिक गुणवैशिष्ट्यांचे मुल्यांकन करण्याकरिता अभ्यास क्षेत्रातील निवड केलेल्या स्थळांवर मृदाचे आठ नमुने संकलित व विश्लेषीत करण्यात आले. संबंधित घटक खालील लक्षणे दर्शवितात.

विविध खोलींवरील मृदा नमुन्यांच्या वैशिष्ट्यांची संबंधित घटकांसाठी तुलना करण्यात आली.

मातीच्या वैशिष्ट्यांवरील निरीक्षणांची चर्चा खाली संबंधित मापदंडांनुसार करण्यात आली आहे.

सर्व संकलित मृदा नमुन्यांची पोत सिल्टी क्ले यात वर्गीकृत करण्यात आली

- कृषक व पडित जमिनीच्या मातीच्या संकलित नमुन्याचा रंग पिवळा, लाल, लालसर तपकीरी आणि तपकीरी आहे.
- मृदा गोळा केलेल्या नमुन्यात स्थूल घनता 1.27 ते 1.52 gm/cc आहे.
- मृदा नमुन्यामधे pH ची मात्रा 7.14 ते 7.42 श्रेणीत आहे. pH मात्रा मृदा नमुने निष्क्रिय असल्याचे दर्शविते
- मृदा नमुन्यामधे वाहकता 298.8 व 372.6 μmhos/cm श्रेणीमधे आहे.
- मृदा नमुन्यामधे जैविक पदार्थ 1.22 ते 1.68 % च्या मधे आहे. जे जमिनीची सुपिकता दर्शवितात.
- मृदा नमुन्यामधे उपलब्ध नायट्रोजनची तीव्रता 239 ते 316 kg/ha च्या श्रेणित आहे.
- मृदा नमुन्यात उपलब्ध फॉस्फोरसची तिव्रता 38 ते 71 kg/ha आहे.
- मृदा नमुन्यात उपलब्ध पोटॅशियमची तिव्रता 124 ते 182 kg/ha आहे.

## 5.0 संभावित पर्यावरणीय प्रभाव आणि नियंत्रण उपाय

### वायु पर्यावरण

मेसर्स जिगसन अलॉयज प्रायव्हेट लिमिटेडच्या प्रस्तावित विस्तारित प्रकल्पामध्ये डोलोमाइट आणि मॅंगनीज ओरचे सध्या सुरू असलेले ग्राइंडिंग आणि स्क्रीनिंग या प्रक्रियांचा समावेश आहे. तसेच, यात रोस्टिंग फर्नेसद्वारे 30,000 TPA मॅंगनीज ऑक्साईड उत्पादन आणि 12,000 TPA मॅंगनीज सल्फेट उत्पादन यांची भर घालण्यात येणार आहे. प्रामुख्याने रोस्टिंग फर्नेस, सामग्रीची हाताळणी, ग्राइंडिंग व स्क्रीनिंग प्रक्रिया आणि उत्पादनाची हाताळणी या पासून वायु उत्सर्जन होऊ शकते.

वायुप्रदूषण कमी करण्यासाठी खालील उपाययोजनांची अंमलबजावणी केली जाईल:

- रोस्टींग फर्नेस एका कार्यक्षम वायू प्रदूषण नियंत्रण प्रणालीशी जोडल्या जातील, ज्यामध्ये वेट स्क्रबर आणि त्यानंतर पुरेशा उंचीची एक सामायिक चिमनी राहिल, जेणेकरून सूक्ष्म कणांचे उत्सर्जन मर्यादेत राहील.
- बॅग फिल्टर बसवून, कणीय उत्सर्जनावर त्याच्या स्रोतावरच प्रभावीपणे नियंत्रित ठेवण्यासाठी ग्राइंडिंग आणि स्क्रीनिंग युनिट्सना धूळ काढण्याची व धूळ संकलित करण्याची प्रणाली पुरवली आहे.
- धूळ निर्माण होण्यावर नियंत्रण मिळवण्यासाठी अंतर्गत रस्ते, कच्च्या मालाची साठवणूक क्षेत्रे आणि माल हाताळणीच्या ठिकाणांवर पाणी फवारण्याची व्यवस्था व धूळ रोखण्याचे इतर उपाय योजले जातील
- वायुमुळे उडणारी धूळ रोखण्यासाठी कच्चा माल आणि तयार उत्पादने निश्चित केलेल्या आच्छादित ठिकाणी साठवली जातील.
- अंतर्गत रस्ते चांगल्या स्थितीत ठेवण्यात येतील आणि संपूर्ण प्रकल्प परिसरात नियमित स्वच्छता व देखभालीच्या पद्धती अंमलात आणल्या जातील.
- पर्यावरणविषयक मार्गदर्शक तत्त्वांच्यानुसार प्रकल्पाच्या सीमेभोवती एक हरित पट्टा विकसित आणि जतन केला जाईल.
- निर्धारित पर्यावरणीय मानकांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी, चिमनीपासून होणारे उत्सर्जन आणि परिसरातील वायुची गुणवत्ता यांचे नियमित निरीक्षण केले जाईल.

- NABL आणि MoEF&CC मान्यताप्राप्त प्रयोगशाळांच्या माध्यमातून वातावरणातील वायुची गुणवत्ता, चिमनीपासून होणारे उत्सर्जन, जल, ध्वनी आणि मृदेची गुणवत्ता यांसारख्या पर्यावरणीय घटकांचे वेळोवेळी निरीक्षण केले जाईल.
- प्रदूषण नियंत्रण उपकरणांची प्रभावी कार्यक्षमता आणि निरंतर वैधानिक पर्यावरणीय मानकांचे सुनिश्चितपणे पालन करण्यासाठी त्यांची नियमित तपासणी व देखभाल केली जाईल.

## ध्वनि प्रदूषण व नियंत्रण उपाय योजना

ध्वनिची पातळी कोणत्याही वेळी केंद्रीय प्रदूषण मंडळाद्वारे ठरविलेल्या मानकापेक्षा अधिक असणार नाही. उपकरण ध्वनि नियंत्रण यंत्राचा वापर करून बनविण्यात येतील. कोणत्याही उपकरणाद्वारे उत्पन्न ध्वनिची पातळी उपकरण्यापासून कुठल्याही दिशेत 1.0 मी च्या अंतरापर्यंत 85 dB(A) पेक्षा अधिक नसणार. याची खात्री केली जाईल व ध्वनि कमी करण्याकरिता सर्वसाधारण नियंत्रण उपाय खाली दिलेले आहेत.

- ❖ ज्या ठिकाणी इतर उपाययोजनांद्वारे ध्वनिचे नियंत्रण प्रभावीपणे करता येत नाही, त्या ठिकाणी ध्वनि निर्माण करणाऱ्या उपकरणांना ध्वनिरोधक आवरण प्रदान करणे.
- ❖ ध्वनि उत्पन्न करणाऱ्या उपकरणांना चालविण्याकरिता ध्वनि रोधक उपकरण व विशिष्ट केबीन उपलब्ध करण्यात येईल जेथे दूरवर्ती नियंत्रकाद्वारे उपकरण चालविण्यात येतील
- ❖ उच्च ध्वनि उत्पन्न स्त्रोतांना पर्याप्त ध्वनि रोधक आवरण पुरविण्यात येईल
- ❖ विविध उपकरणांची नियमित देखरेखा व्यतिरिक्त अधिक ध्वनी असलेल्या क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना ईअर मोफलर, ईअर प्लग पुरविण्यात येईल. सर्व आवरण, विभाजन योग्य प्रकारे आखण्यात येतील.

❖ इनलेट आणि आऊटलेटला मफलर्स पुरविण्यात येतील ज्याची बनावट सोपी राहिल.

❖ सर्व फिरत्या वस्तुंना चांगल्या प्रकारे ऑयलिंग करण्यात येईल व शक्य तितके ध्वनि संचार कमी करण्याकरिता आवरण पुरविण्यात येतील. तपासणी व कंपन कमी करण्याकरिता व्यापक कंपन तपासणी प्रणाली पुरविण्यात येईल. जेव्हा जेव्हा शक्य असेल कंपन व ध्वनि कमी करण्याकरिता कंपन आयसोलेटिंग पुरविण्यात येईल.

**पाण्यावर प्रभाव**

प्रस्तावित प्रकल्पाकरिता 52 KLD पाण्याची गरज आहे. पाणी भूजल स्रोतापासून प्राप्त केले जाईल. प्लांटच्या प्रक्रियादरम्यान, जिगिंग/वॉशिंग प्रक्रियेतून सांडपाणी निर्माण होईल. या प्रक्रियेत निर्माण झालेले सांडपाणी सेटलिंग टँकमध्ये साठवले जाईल आणि प्रक्रियेत त्याचा पुनर्वापर केला जाईल. मॅगनीज सल्फेटच्या उत्पादनापासून निर्माण होणाऱ्या सांडपाण्यासाठी, पुढील प्रक्रिया, पुनर्वापर किंवा विल्हेवाट लावण्यापूर्वी pH समायोजित करण्याकरिता एक इक्वालायझेशन टँक उपलब्ध केला जाईल. मॅगनीज सल्फेट उत्पादनामध्ये सामान्यतः सल्फ्यूरिक एसिडचा वापर होत असल्याने, हे सांडपाणी सामान्यतः आम्लधर्मी असते आणि त्याचे न्यूट्रलाइजेशन करणे गरजेचे असते. सांडपाणी पॅकेज्ड STP मध्ये प्रक्रियाकृत केले जाईल. प्रकल्प परिसराबाहेर कोणतेही सांडपाणी सोडले जाणार नाही आणि शून्य निस्सारण पद्वतीचा अवलंब केला जाईल.

**घनकचरा निर्मिती**

मेसर्स जिगसन अलॉयज प्रायव्हेट लिमिटेडच्या प्रस्तावित विस्तारित प्रकल्पामुळे प्रामुख्याने एश आणि प्रक्रिया–अवशेष या स्वरूपात घनकचरा निर्माण होईल. घनकचरा निर्मिती, त्याचे प्रमाण आणि त्याची विल्हेवाट किंवा पुनर्वापराचा तपशील खालीलप्रमाणे आहेः

**तक्ता : घनकचरा निर्मिती आणि नियंत्रण उपाय**

| अनु क्र. | घनकचरा | प्रस्तावित मात्रा (TPA) | विल्हेवाट / वापर |
|---|---|---|---|
| 1. | हार्ड कोक एश | 800 | विटा उत्पादकांना विकले जाईल. |
| 2. | फायरवुड एश | 240 | विटा उत्पादकांना विकले जाईल. |
| 3. | अवशेष/टेलिंग/ गाळ | 4000 | कोरडे टेलिंग्ज / गाळ (ज्यामध्ये $SiO_2$ आणि $Fe_2O_3$ चे प्रमाण अधिक असते) यांचा वापर सिमेंटमध्ये पूरक घटक म्हणून किंवा विटांच्या निर्मितीत मातीचा पर्याय म्हणून केला जाईल. |

## 6.0 पर्यावरणात्मक निरिक्षण कार्यक्रम

प्रकल्पाच्या बांधकाम व प्रक्रिया टप्प्यांदरम्यान CPCB/SPCB मानकांचे पालन सुनिश्चितपणे करण्यासाठी तसेच प्रदूषण नियंत्रण उपाययोजनांची कार्यक्षमता तपासण्यासाठी पर्यावरणीय निरीक्षण कार्यक्रम (EMP) राबविण्यात येईल. निर्धारित नियमांनुसार नियमित अंतराने परिवेशी वायुची गुणवत्ता ($PM_{10}$, $PM_{2.5}$, $SO_2$, NOx), चिमनीतील उत्सर्जन, पाण्याची गुणवत्ता, ध्वनी पातळी आणि मातीची गुणवत्ता यांचे निरीक्षण केले जाईल.

.निरीक्षणाशी संबंधित सर्व कामकाजाचे पर्यवेक्षण करण्यासाठी, नोंदी राखण्यासाठी आणि नियामक प्राधिकरणांना वेळेवर अहवाल सादर करण्यासाठी स्वतंत्र पर्यावरण व्यवस्थापन सेल स्थापन करण्यात येईल. हा कार्यक्रम संभाव्य पर्यावरणीय परिणामांचे लवकर निदान करण्यास आणि आवश्यक सुधारात्मक उपाययोजना तात्काळ राबविण्यास मदत करेल, ज्यामुळे प्रकल्पाचे शाश्वत व पर्यावरणपूरक संचालन सुनिश्चित होईल

## 7.0 अतिरिक्त अभ्यास

सार्वजनिक सल्लामसलत, जोखीम मूल्यांकन आणि आपत्ती व्यवस्थापन योजना हे MoEF&CC ने जारी केलेल्या ToR. नुसार केलेला अतिरिक्त अभ्यास आहे. व ते EIA अहवालात समाविष्ट केले आहे.

## 8.0 प्रकल्पांचे फायदे

### कॉर्पोरेट पर्यावरण जबाबदारी (CER)

विकासात्मक उपक्रम हे सामुदायिक प्राधान्य आणि स्थानिक योगदानावर आधारित असले पाहिजेत. सामाजिक प्रभाव मूल्यांकनाद्वारे आणि जनसुनावणी दरम्यान उपस्थित मुद्दयाच्या आधारावर EIA उपक्रम राबविण्यात येईल. ज्यामुळे स्थानिक लोकांना फायदा होईल.

### CER बजेट

- अंतिम CER बजेट जनसुनावणी आयोजित केल्या नंतर जनसुनावणी दरम्यान उपस्थित मुद्द्यानुसार निश्चित करण्यात येईल.
- जनसुनावणी दरम्यान उपस्थित मुद्द्यानुसार विविध उपक्रमांवर निधी खर्च करण्यात येईल.
- CER उपक्रम यशस्वीपणे पूर्ण झाल्यानंतर CSR करिता आणखी गाव निवडण्यात येतील.
- प्रकल्प कार्यान्वित असे पर्यंत CSR उपक्रम नियमित राहिल.

## 9.0 पर्यावरणीय व्यवस्थापन योजना

बांधकाम आणि प्रक्रिया टप्प्यांदरम्यान पर्यावरण व्यवस्थापन योजनेचे पालन केले जाईल. पर्यावरणीय पायाभूत सुविधांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी दरवर्षी तरतूद केल्या जाणाऱ्या आवर्ती बजेटव्यतिरिक्त, या प्रकल्पांतर्गत पर्यावरण व्यवस्थापन योजनेतील भांडवली कामे राबवण्यासाठी 50 लाख रुपयांच्या बजेटची तरतूद करण्यात आली आहे. प्रस्तावित प्रकल्पासाठी एक पर्यावरण व्यवस्थापन सेल स्थापन केला जाईल.

## 10.0 हरित पट्ट्याचा विकास

प्रकल्पाच्या एकूण क्षेत्रापैकी सुमारे 7992.55 वर्ग मी. (25%) क्षेत्र व्यापणारा हरित पट्टा प्रकल्प परिसरात विकसित केला जाईल. हरित पट्टा विकसित करण्यासाठी

वृक्षारोपणाचे काम CPCB च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार केले जाईल आणि यामध्ये स्थानिक प्रजातींना प्राधान्य दिले जाईल.

प्रस्तावित प्रकल्पाच्या सभोवती हरित पट्टा किंवा वृक्षारोपण केल्यास, त्या परिसरातील सूक्ष्म कणांचे दुष्परिणाम रोखण्यास मदत होईल आणि पर्यावरण संवर्धनाच्या प्रयत्नांमध्येही महत्त्वाची भूमिका बजावली जाईल. या प्रकल्पाच्या नियोजनात हरित पट्टाचा विकास आणि वृक्षारोपण कार्यक्रमाचाही समावेश राहिल. टप्प्याटप्प्याने 7992. 55 वर्ग मी. क्षेत्र हरित पट्टा म्हणून विकसित केले जाईल. प्रकल्प परिसरात आधीच सुमारे 500 झाडे लावण्यात आली आहेत. याव्यतिरिक्त, वनविभागाच्या सल्ल्याने हरित पट्टा विकास कार्यक्रमांतर्गत आणखी सुमारे 1500 झाडे लावली जातील. या वृक्षारोपणामध्ये प्रामुख्याने स्थानिक आणि प्रदूषण–प्रतिरोधक प्रजातींचा समावेश राहिल. उदा. कडुनिंब (अझाडिराक्टा इंडिका), अशोक (पॉलीअल्थिया लॉगिफोलिया), करंज (पोंगामिया पिनाटा), आंबा (मँगीफेरा इंडिका), जांभूळ (सिझिजियम क्युमिनी), अर्जुन (टर्मिनलिया अर्जुना) आणि आवळा (फिलांथस एम्ब्लिका). या वृक्षारोपणामुळे स्थानिक पर्यावरणात सुधारणा होण्यास, जैवविविधता वाढण्यास आणि पर्यावरणीय समतोल राखण्यास मदत होईल.

## 11.0 निष्कर्ष

मेसर्स जिगसन अलॉयज प्रायव्हेट लिमिटेड ने विद्यमान डोलोमाइट आणि मॅंगनीज ओरच्या ग्राइंडिंग आणि स्क्रीनिंग प्रकल्पाचा विस्तार करण्याचे नियोजित केले आहे, ज्यामध्ये 30,000 TPA मॅंगनीज ऑक्साईड आणि 12,000 TPA मॅंगनीज सल्फेट उत्पादन प्रकल्प समाविष्ट आहेत हे पर्यावरण संरक्षण आणि शाश्वत विकास यांचा योग्य विचार करून करण्यात आले आहे.

पर्यावरणीय अभ्यासाच्या प्राथमिक निष्कर्षांवरून असे दिसून येते की, संबंधित क्षेत्रातील सध्याची पर्यावरणीय गुणवत्ता विहित मानकांनुसार आहे. प्रस्तावित प्रकल्पामुळे होणारे संभाव्य पर्यावरणीय परिणाम प्रभावीपणे नियंत्रित केले जातील, यासाठी वेट स्क्रबर्स, बॅग फिल्टर्स, सांडपाणी प्रक्रिया व पुनर्वापर सुविधा, शास्त्रीय घनकचरा व्यवस्थापन पद्धती आणि प्रकल्पाच्या एकूण क्षेत्रापैकी 25% भागावर

हरितपट्टा विकसित करणे यांसारख्या कार्यक्षम प्रदूषण नियंत्रण प्रणालींची अंमलबजावणी केली जाईल.

हा प्रकल्प संसाधनांचे जतन, पाण्याचा पुनर्वापर, शुन्य निस्सारण पद्धती, नियमित पर्यावरणीय देखरेख आणि लागू असलेल्या सर्व पर्यावरणीय नियमांचे पालन या तत्त्वांवर आधारित असेल.

प्रस्तावित विस्तारामुळे रोजगाराच्या संधी निर्माण होतील, मॅंगनीज ओरच्या मूल्य वाढीस चालना मिळेल, पूरक उद्योगांच्या विकासास मदत होईल आणि या क्षेत्राच्या सामाजिक–आर्थिक विकासात योगदान मिळेल. प्रस्तावित उपाययोजना आणि पर्यावरण व्यवस्थापन पद्धतींच्या अंमलबजावणीमुळे, या प्रकल्पामुळे परिसरातील पर्यावरणावर कोणताही महत्त्वपूर्ण विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाही.